राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ मध्ये परिचर्या प्रशिक्षण केंद्राकरीता उपलब्ध असलेल्या अनुदानातून मॉडेल्स व मॅनिक्विन्स खरेदीकरीता प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०२१९/प्र.क्र. १२८/आरोग्य -७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : १६ मार्च, २०१९.

वाचा :-

अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील पत्र क्र.राआसो/नर्सिंग/९६९२८/१९, १८ जानेवारी, २०१९.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता प्राप्त अनुदानातून राज्यभरातील १६ परिचर्या प्रशिक्षण केंद्राकरीता आवश्यक असणाऱ्या मॉडेल्स व मॅनिक्विन्स खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ या वर्षाकरीता पीआयपी मध्ये मान्यता प्राप्त झालेली असून FMR Code ९.१.५ अंतर्गत Strengthening of Existing Training Institutions/ Nursing School करीता मॉडेल्स व मॅनिक्विन्स खरेदी करण्यासाठी रु.१३४.६९ लक्ष इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांनी प्रस्तावित केल्यानूसार सदर उपलब्ध अनुदानातून रु.१२२.२८ लक्ष इतक्या रकमेची मॉडेल्स व मॅनिक्विन्स खरेदी करणेबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर मॉडेल्स व मॅनिक्विन्स यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

प्रपत्र- मॉडेल्स व मॅनिक्विन्स खरेदीचा तपशिल

Sr. No.	Name of District/Nursing School	Adult Male	Adult Female	Child	Newborn	CPR	Adult human articulated Skeletion with hanging facility in a glass cupboard with locking facility	Full set of disarticulated adult human Skeleton	Full Size Human body showing all muscles and arteries	Human torso-male	Human Torso-Female
1	Tentative Prices In Lakhs.	1.36	0.68	0.85	0.40	0.68	0.17	0.24	0.35	0.17	0.17
2	Amravati	2	2	1	2	1	2	2	1	2	2
3	Ahmednagar	2	2	1	2	1	1	0	1	1	2
4	Beed	0	2	1	2	0	1	1	1	1	2
5	Beed (Kej)	2	2	1	2	1	2	2	1	2	2
6	Chandrapur	1	1	0	1	0	1	1	1	2	2
27	Gondia	2	2	1	0	1	2	1	1	2	2
8	Jalgaon	2	2	1	2	1	1	1	1	2	2
9	Nashik	2	2	1	2	1	1	1	1	2	2
10	Nanded	2	2	1	2	1	1	2	1	1	1
11	Osmanabad	0	0	0	0	0	0	0	1	0	2
12	Parbhani	2	2	1	0	1	2	1	1	1	2
13	Raigad	2	2	1	1	0	2	2	1	2	2
14	Ratnagiri	2	2	0	0	1	2	2	1	2	2
15	Satara	2	2	1	2	1	1	1	1	1	1
16	Sindhudurg	2	2	1	2	1	1	1	1	2	2
17	Thane	1	1	1	0	0	1	1	1	0	1
18	Total Models and Mannequines	26	28	13	20	11	21	19	16	23	29
19	Total Budget (In Lakhs)	35.36	19.04	11.05	8.00	7.48	3.57	4.68	5.6	3.91	4.93
Total Budget with GST Rs.122.276 Lakhs											

उपरोक्त मॉडेल्स व मॅनिक्विन्स खरेदीबाबत खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मॉडेल्स व मॅनिक्विन्सची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू मॉडेल्स व मॅनिक्विन्सची विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत.

तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियान मंजूर सन २०१८-१९ नुसार पीआयपी मध्ये उपलब्ध असलेल्या FMR Code 9.1.5 नूसार उपलब्ध रु.१३४.६९ अनुदानातून भागविण्यात यावा.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

३. उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई व संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई आणि सदरहू कार्यक्रम राबविणाऱ्या कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 201903151229189517 असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.16 10:41:45 +05'30'

(निलेश फाळके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक/ सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
८) निवडनस्ती (आरोग्य-७)